भूमिका

विषयाची निवड

पूर्वाभ्यासाचे स्वरूप

प्रस्तुत अभ्यासाचे स्वरूप व महत्त्व

अभ्यासपद्धती

प्रकरणीकरण

## भूमिका:

मराठीतील लोकप्रिय कादंबरीकार म्हणून शिवाजी सावंत यांचा उल्लेख करावा लागेल. 'मृत्युंजय', 'युगंधर' या पौराणिक व 'छावा' या ऐतिहासिक कादंबऱ्यांनी सावंत यांना 'कादंबरीकार' म्हणून लोकमान्यता व रसिकमान्यता प्राप्त करून दिली. १९६७ साली 'मृत्युंजय' ही कादंबरी प्रसिद्ध झाली तेव्हापासून 'मृत्युंजयकार' म्हणूनच त्यांना संबोधले जाऊ लागले. सावंत यांनी कादंबरी, चरितकहाणी, व्यक्तिचित्रण, ललितलेखन, नाट्यलेखन, या प्रकारच्या वाङ्मयाची निर्मिती केली आहे. सावंताना अनेक मानसन्मान मिळाले. यामध्ये भारतीय ज्ञानपीठाचा 'मूर्तिदेवी' पुरस्कार (१९९५), 'पूनमचंद भुतोडिया' हा बंगालजी पुरस्कार (१९८६), महाराष्ट्र राज्य पुरस्कार (१९६७), पुणे विद्यापीठाचा 'जीवनगौरव' पुरस्कार (१९९९), 'कोल्हापूर भूषण' पुरस्कार (२०००) इत्यादी पुरस्कार त्यांना लाभले. नोबेल पुरस्कारासाठी त्यांच्या 'मृत्युंजय'चे नामांकन झाले (१९९०), अध्यक्ष मराठी साहित्य संमेलन बडोदे (१९८३), उद्घाटक विदर्भ साहित्यसंमेलन दर्यापूर (१९९६), उद्घाटक दक्षिण महाराष्ट्र साहित्यसंमेलन, बेळगांव (१९८६) ही साहित्य जगतातील प्रतिष्ठित पदेही त्यांनी भूषविली. पुणे व कोल्हापूर महानगरपालिकेने आणि 'आजरा' या जन्मगावातील समस्त आजरेकरांनी 'सन्मानपत्र' देऊन त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव केला. त्यांच्या साहित्य कृतींना रसिकाश्रय लाभला त्यामुळे त्यांच्या साहित्यकृतींच्या अनेक आवृत्या निघाल्या. (या आवृत्या अशा 'मृत्युंजय', २५री आवृत्ती, 'छावा', ११वी आवृत्ती) साहित्यिक व व्यक्ती म्हणून साहित्यात व मराठी भाषकात त्यांना एक आत्मियतेचे व सन्मानाचे स्थान प्राप्त झाले. महत्त्वपूर्ण साहित्यिक म्हणून शिवाजी सावंत यांचे नाव सर्वश्रुत आहे.

कराड येथे २००३ साली संपन्न झालेल्या ७६व्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी शिवाजी सावंत मराठी रसिकांच्यासमोर एक उमेदवार म्हणून आले. चर्चेत राहिले, प्रचाराची रणधुमाळी सुरु झाली. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ठरविणारे मराठी साहित्य महामंडळातील प्रस्थापित मक्तेदार आणि बांधिल मतदार कोणाची निवड करतील याची फिकीर न करता शिवाजी सावंत यानी मराठी रसिकांचा कौल घेण्यासाठी आपली साहित्यिक प्रतिष्ठा निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवार म्हणून पुढे आणली. अध्यक्षपदाच्या निवडणूकीसाठी मतदार नसलेल्या असंख्य मराठी रसिकांनी सावंताना मनोमनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष केले होते. अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला असतानाच शिवाजी सावंताचे आकस्मिक निधन झाले. (गोवा-मडगाव, बुधवार १८ सप्टेंबर, २००२) त्यांच्या निधनाने मराठी

भाषीक हादरुन गेला. आप्त गेल्याचे दु:ख महाराष्ट्राने अनुभवले. भारतीय संस्कृतीतील अभिमान असणाऱ्या व्यक्तिरेखाचे भव्यदर्शन घडविणाऱ्या शिवाजी सावंत यांच्या निधनाने मराठी साहित्यातला एक ताराच निखळला. कर्णाच्या जीवनाची शोकात्मक कहाणीच शिवाजी सावंत यांच्या जीवनातून प्रत्ययास येते.

**विषयाची निवड :**

माझ्या जन्मभूमीच्या परिसरातील 'आजरा' येथे जन्मलेला आणि वाढलेला हा साहित्यिक ! शालेय शिक्षणाबरोबर शिवाजी सावंताचा साहित्यिक परिचय वाढत गेला. त्यांच्या व्यक्तित्त्वाविषयी कुतूहल निर्माण होत गेले. पदवी पदव्युत्तर अभ्यासाबरोबर जसजशी 'माझी साहित्यिक जाण' वाढत गेली तसतसे शिवाजी सावंतांच्या वाङ्मय कृतींचे मोठेपण भावू लागले. त्यांच्याविषयी अभिमान वाटू लागला. त्यांच्या साहित्याचे जाणीवपूर्वक वाचन-चिंतन होऊ लागले. त्यांच्याकडून अधिक कसदार साहित्याची निर्मिती होत राहील अशी अपेक्षा असताना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या ऐन धुमाळीत अनपेक्षितपणे शिवाजी सावंत यांना मृत्यूला सामोरे जावे लागले. अन्य मराठी भाषकाप्रमाणे मलाही त्यांच्या निधनाने धक्का बसला आणि तीव्र दु:खही झाले. शिवाजी सावंत यांच्या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करावा ही उर्मी प्रबळ झाली. त्यांच्या वाङ्मयकृतींच्या यशापयशाची गमके शोधावीत, त्यांच्या साहित्यकृतीचे वाङ्मयीन मूल्यमापन करावे असे मनोमन वाटू लागले. अशा वेळीच त्यांच्या निधनाची बातमी आली. परिणामी शिवाजी सावंत यांच्या व्यक्तित्त्वाचा आणि वाङ्मयाचा समग्र अभ्यास करण्याचे योजिले आणि प्रबंध शीर्षक निश्चित केले ते असे - ''शिवाजी सावंत : व्यक्ती आणि वाङ्मय''

**पूर्वाभ्यासाचे स्वरूप :**

शिवाजी सावंत यांच्या 'मृत्युंजय' (१९६७), 'युगंधर' (२०००) आणि 'छावा' (१९७९) या कादंबऱ्यांनी मराठीतील पौराणिक ऐतिहासिक कादंबरीला नवे परिमाण प्राप्त करून दिले. त्यांच्या निधनानंतर विविध नियतकालिकांतून त्यांच्याविषयी अनेक लेख प्रसिद्ध झाले. हे लेख शिवाजी सावंताच्या साहित्यिक मोठेपणाला अधोरेखित करणारे आणि कौतुक भरले आहेत. स्वाभाविकच शिवाजी सावंत यांच्या साहित्याविषयी मान्यवर मराठी समीक्षकांच्या लेखनाकडे वळलो तेव्हा मराठी समीक्षेतही डॉ. पु.ग. सहस्त्रबुद्धे (महाभारताचे महातेज आत्मसात केलेली कलाकृती), डॉ. शालिनी मोहोड (छावा: एक श्रेष्ठ कादंबरी), शंकर सारडा (शिवाजी सावंत यांचे ललित व स्फुटलेखन), प्रदीप भट्टाचार्य (कादंबरी नव्हे महाकाव्य !) प्रा.

चंद्रकुमार नलगे (सावंताचे नमुनेदार व्यक्तिचित्रण), जयंतकुमार त्रिभुवन (शिवाजी सावंतांची खिळवून ठेवणारी नाटके), प्रा. जगन्नाथ पाटील ('मृत्युंजय' आणि 'युगंधर' एकाच नाण्याच्या दोन बाजू), भीमराव कुलकर्णी ('मृत्युंजय' पावडर घालून पिकविलेले महाभारताचे फळ), श्रीराम पंडित ('मृत्युंजय'), भास्कर नंदनवार ('मृत्युंजय'कार शिवाजी सावंत) या समीक्षकांनी घेतलेली नोंद स्फुट स्वरूपातच असल्याचे निदर्शनास आले. त्यांच्या 'मृत्युंजय' या कादंबरीचे भरपूर कौतुक झाले. तिने पौराणिक कादंबरीला दिलेले नवे वळणही विवेचले गेले. तुलनेने कमी असले तरी 'छावा', 'युगंधर' या कादंबऱ्यांना हे कौतुक लाभले. मात्र सावंताच्या चरितकहाणी लेखन, ललित लेखन या प्रकारच्या लेखनाची दखल फारशी घेतली गेली नाही. 'मृत्युंजय'च्या यशात भाविक लोकप्रियतेत त्यांचे अन्य साहित्य झाकोळले गेले. 'मृत्युंजय', 'छावा', 'युगंधर' या कादंबऱ्यांचा संशोधनात्मक दृष्टीने समग्र विचार झाला नाही. 'मृत्युंजय' या कादंबरीच्या नाट्यरुपांतराचा अभ्यास मीरा जोशी यांनी केला. अर्थात त्यांच्या या अभ्यासात 'नाट्यरुपांतरला' प्राधान्य दिले जाणे स्वाभाविक होते. श्री. एम.पी. शेळके यांनी शिवाजी सावंतांच्या 'मृत्युंजय', 'छावा' (कादंबरी, नाटक) 'लढत', 'अशी मने असे नमुने' या कलाकृतींचा यशापयशाचा व वाङ्मयीन मूल्यमापनाचा अभ्यास केला आहे. सावंताच्या एकसष्टीनिमित्त संपादित केलेले ''मृत्युंजयकार शिवाजी सावंत व्यक्ती आणि साहित्य'' (शांताराम वाघ), सावंत यांच्या निधनानंतर प्रसिद्ध झालेले 'आठवणींतले शिवाजी सावंत' (प्रा. मिलिंद जोशी), 'युगंधर साहित्यिक' (जयराम देसाई) या संपादित ग्रंथातून शिवाजी सावंत यांच्या वाङ्मयासंबंधीच्या स्फुट लेखनाला प्रसिद्धी मिळाली आहे. हे लेखन सावंताच्या साहित्याचा वरवरचा आढावा घेणारे आहे. संशोधनात्मक वा समीक्षात्मक दृष्टिकोणाचा अभाव त्यात आहे. 'मृत्युंजय', 'छावा', 'युगंधर' या कादंबऱ्यावर डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर (मृत्युंजय), प्रा. रा.ग. जाधव (मृत्युंजय : एक मागोवा), अनिरूद्ध कुलकर्णी (स्वत:च भारतीय स्थान निर्माण करणारे कादंबरीकार), भा.द. खेर (युगंधर साहित्यप्रेरणा), प्र.के. अत्रे (मृत्युंजय), डॉ. उषादेवी कोल्हटकर (सोनपुतळं पाऊल), सुधीर गाडगीळ (युगंधर : आगळा वेगळा कसा ?), रामनारायण उपाध्याय (कालजयी कृतिकार शिवाजी सावंत) या समीक्षकांचे लेख लक्षणीय आहेत. पण त्यात 'समग्रदृष्टीचा' स्वाभाविक अभाव जाणवतो. त्यामुळे शिवाजी सावंत यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि वाङ्मयाचा समग्र अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले.

**प्रस्तुत अभ्यासाचे स्वरूप व महत्त्व :**

लोकमान्यता, राजमान्यता आणि रसिकमान्यता प्राप्त झालेल्या शिवाजी सावंत यांची मराठी समीक्षेने लक्षात येईल अशी दखल घेतल्याचे आढळत नाही. असे

का व्हावे ? त्यात जाणीवपूर्वकता आहे की खरोखरच सावंत यांच्या वाङ्मयकृतीच्या काही मर्यादा आहेत. असल्याच तर त्या मर्यादा कोणत्या ? त्यांच्या वाङ्मयाची मर्मस्थाने कोणती ? साहित्यिक म्हणून त्यांचे मोठेपण कोणते ? या स्वरूपाचे अनेक प्रश्न मनात उभे राहू लागले आणि या प्रश्नांना शोध घेण्यासाठी शिवाजी सावंत यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या वाङ्मयाचा संशोधनात्मक दृष्टीने केलेला अभ्यास महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हा अभ्यास त्यांच्या साहित्याचे वेगळेपण कोणते ? त्यांच्या वाङ्मयाच्या लोकप्रियतेची कारणे कोणती ? त्याचे स्वरूप कोणते ? शिवाजी सावंत यांना श्रेष्ठ साहित्यिक असे म्हणता येईल का ? असल्यास का ? नसल्यास का नाही ? त्यांच्या साहित्यकृतीचे वाङ्मयीन मूल्य कोणते ? या आणि यासारख्या अनेक प्रश्नांचा शोध घेणारा हा अभ्यास महत्त्वाचा ठरणार आहे.

**अभ्यासपद्धती :**

शिवाजी सावंत यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करण्यासाठी कोणतीही एक समीक्षा पद्धती पुरेशी ठरणार नाही. म्हणून अभ्यासात चरित्रात्मक समीक्षा पद्धती, ऐतिहासिक समीक्षा पद्धती आणि समाजशास्त्रीय समीक्षा पद्धती या अभ्यासपद्धतींचा समन्वय साधला आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी संशोधनविषयाचे वेगवेगळे विभाग, उपविभाग करून अभ्यास केला आहे. हा अभ्यास पुढील प्रकरणातून केलेला आहे.

**प्रकरणीकरण :**

१. शिवाजी सावंत यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण

२. शिवाजी सावंत यांचे कादंबरीलेखन

३. शिवाजी सावंत यांचे चरितकहाणीलेखन

४. शिवाजी सावंत यांचे ललितलेखन

५. शिवाजी सावंत यांची नाट्यरूपांतरे

६. शिवाजी सावंत यांचे संकीर्ण साहित्य

७. उपसंहार

---